**आर आर पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना (आबा)**

६. **योजनेचे नांव :- आर आर (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना**

७. **योजना कोणाची** :- सदरची योजना महाराष्ट्र शासनाची असून जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत राबविण्यात येते.

८. **योजनेची संक्षिप्त माहिती**:- पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेचे रुपांतर करुन नविन "स्मार्ट ग्राम" योजना सुरू केली आहे. त्यानंतर सादर योजनचे दिनांक 20 मार्च 2020 रोजीच्या शासन निर्णय द्वारे सादर योजनेचे नाव नाव **आर आर (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना असे करण्यात आले.**

९. लोकसहभागातून उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा विकास करुन पर्यावरणाचा समतोल राखणे, समृध्द ग्राम निर्माण करणे व राज्य शासनाच्या विविध विभागाच्या ग्रामस्तरीय योजनांची सांगड घालून योजनांचा समन्वय करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीस योजनेत सहभागी होण्याची समान संधी उपलब्ध आहे.

१०. **योजनेचे निकष व अटी**:- निकषाच्या आधारे गुणांकन व पारदर्शकता ठेवून ग्रामपंचायतीची निवड करण्यात येते. योजनेत सहभागी होण्यासाठी 5000 पेक्षा जास्त लोकसंख्या असणा-या ग्रामपंचायती, शहरालगत असणा-या ग्रामपंचायती, पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती व उर्वरीत ग्रामपंचायती अशी विभागणी केलेली आहे व त्यानुसार गुणांकन दिलेले आहे. ग्रामपंचायतीला त्यांच्या क्षमतेनुसार गुणांकन देण्यात आले आहे. गुणांकन पध्दत ही स्वच्छता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपारिक उर्जा आणि पर्यावरण, पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा वापर या आधारावर आहे. याकरिता एकूण 100 गुण ठेवण्यात आले आहे.

११. **योजनेचे फायदे** :- तालुकास्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त ग्रामपंचायतीची "**तालुका सुंदर गाव** " म्हणून निवड होणार आहे. सदर तालुका **सुंदर गाव** म्हणून निवड झालेल्या ग्रामपंचायतीसरक्कम रु.10.00 लक्ष रुपयाचे बक्षिस मिळणार आहे. तसेच जिल्हा स्तरीय तपासणी समिती तालुका **सुंदर गाव** म्हणून निवड झालेल्या 12 तालुक्यातील ग्रामपंचायतीचे पुनर्मुल्यांकन करुन सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीस **जिल्हा सुंदर गाव** म्हणून निवड होणार आहे. सदर ग्रामपंचायतीलारक्कम रु.40.00 लक्ष रुपयाचे बक्षिस मिळणार आहे. सदर बक्षिसामधून गावातील विकास कामे होणार आहेत.

सदर योजनेतंर्गत शासनाच्या विविध योजना 100% यशस्वीपणे राबविण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये स्पर्धात्मक वातावरण तयार होवून शासनाच्या सर्व योजना तळागाळापर्यंत पोहचण्यास मदत होणार आहेत.